वार्षिक अहवाल
२०२५-२०२६

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट

१५ वा वार्षिक अहवाल



# वाढत्या विश्वासाचा...
# यशस्वी वाटचालीचा प्रवास!

2026

हजारो सदस्यांचा विश्वास आणि
सातत्यपूर्ण प्रगतीची गौरवशाली परंपरा.

सहकारातून समृद्धीकडे...

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट

जिथे **विश्वास** आणि **सुरक्षितता** एकत्र येतात

Reg.No.: MSCS/CR/404/2011

## कार्यरत शाखा

**मुख्य कार्यालय : जुना मोंढा, माजलगाव जि.बीड • मो.7720061987, 7507949494**
**Web.: shrimangalnath.com | Email : mangalnathho@gmail.com**

### मुख्य शाखा : माजलगाव
जुना मोंढा, माजलगाव जि.बीड
मो.7720061986

### मार्केट यार्ड,माजलगाव
नविन बसस्टँड समोर, छ.शिवाजी महाराज चौक, माजलगाव
मो.7720061981

### परळी (वै.)
अभय बेकरीच्या बाजुस, उड्डाणपुल जवळ, परळी वै.जि.बीड
मो.8380021878

### दिंद्रुड
पोस्ट ऑफीस समोर, बसस्टँड रोड, दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड
मो.7720061983

### छत्रपती संभाजीनगर
६७/१ एफ सेक्टर, युनियन बँकेजवळ, जय सेवालाल चौक, एन-४ सिडको, छ.संभाजीनगर मो.7720061984

### कुंभारी पिंपळगाव
उडाण कॉम्प्लेक्स, बसस्टँड जवळ, कुंभारी पिंपळगाव ता.घनसावंगी जि.जालना मो.7720061989

### किट्टीआडगाव
मेन रोड, किट्टीआडगाव ता.माजलगाव जि.बीड
मो.7720061988

### जालना
सिंधी पंचायत भवनच्या बाजुला, देवळगाव राजा रोड, जालना ता.जि.जालना मो.7720061985

### टाकरवण
छत्रपती कॉम्प्लेक्सच्या बाजुला, गेवराई रोड, टाकरवण ता.माजलगाव जि.बीड मो.8380002195

### औराद (बि.)
शॉप नं.१४/१५ गणेश मॉल, उपे पेट्रोल पंपाजवळ,औराद जि.बिदर (कर्नाटक) मो.8380032074

### परतूर C.S.P.
स्टेशन रोड, इंडीया बँकेजवळ, परतूर ता.परतूर जि.जालना
मो.7066048323

### लातूर C.S.P.
मार्केट यार्ड जवळ, ॲक्सीस बँकेच्या बाजुला, कव्हा रोड, लातूर ता.जि.लातूर
मो.7066048325, 8380021879

### वाळुज C.S.P.
शॉप नं..४, सी.एस.आर.कॉम्प्लेक्स, छ.संभाजी म.चौक, वाळुज (छ.संभाजी नगर) मो.7066048338

## ।। श्रद्धास्थान ।।

।।श्री मंगलनाथ देवस्थान।।





श्री गुरू तपोरत्न प्रभु पंडीताराध्य
शिवाचार्य महाराज माजलगावकर

पिठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ परमपूज्य
चंद्रशेखर शिवाचार्य महाराज



## सन्माननीय संचालक मंडळ

| अ.क्र. | संचालकाचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | सौ.कानडे जयदेवी रामेश्वर | चेअरमन |
| २ | श्री.जाधव नारायण मालन | व्हा.चेअरमन |
| ३ | श्री.कानडे रामेश्वर गंगाराम | संचालक |
| ४ | श्री.सपाटे रमेश लिंबाजी | संचालक |
| ५ | श्री.गूळवे सूधाकर भगवान | संचालक |
| ६ | सौ.रोहीणकर शिवकन्या नारायण | संचालिका |
| ७ | श्री.खरात प्रदिप अत्याबा | संचालक |
| ८ | श्री.गवरकर पशुपती त्रिंबक | तज्ञ संचालक |
| ९ | श्री.रोहीणकर नारायण परसराम | तज्ञ संचालक |
| १० | श्री.कानडे रविंद्र रामेश्वर | व्यवस्थापकीय संचालक |

## कायदेशीर सल्लागार मंडळ

ॲड.विश्वास जोशी
ॲड.एस.आर.आचार्य
ॲड.प्रणिता पाटील
ॲड.मोहीत देशमुख

ॲड.दिपक देशमुख
ॲड.एच.एस.बडे
ॲड.दिपक ढाकणे

ॲड.पवन साळुंके
ॲड.रविंद्र डुरे
ॲड.गिरीष नरवणे

## संस्थेचे अर्बिट्रेटर

**ॲड.अजीत देशमुख** लवाद प्राधिकरण, बीड

# परिशिष्ट - अ

| | |
|---|---|
| संस्थेचे नांव | श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सो.लि. माजलगांव |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | नवा मोंढा, माजलगांव ता.माजलगांव जि.बीड ४३११३१ |
| नोंदणी दिनांक | 04/04/2011 |
| नोंदणी क्रमांक | MSCS/CR/404/2011 |
| संस्थेचा व्यवहार सूरू झाल्याची तारीख | 21/04/2011 |
| कार्यक्षेत्र | महाराष्ट्र व कर्नाटक |

*रककम लाखात*

| | |
|---|---|
| नियंत्रक कार्यालये व विस्तार कक्षांसह शाखा संख्या | 1+13 = 14 शाखा |
| अधिकृत भाग भांडवल | 30 Cr. |
| सभासदत्व | 36216 |
| वसुल भाग भांडवल | 1114.90 |
| राखीव निधी व इतर निधी | 2041.18 |
| ठेवी | 30287.33 |
| कर्ज | 25166.14 |
| गूंतवणूक | 9743.28 |
| निव्वळ एन.पी.ए.प्रमाण | 0.00% |
| लेखा परीक्षण वर्ग | अ |
| आर्थिक वर्षातील निव्वळ नफा | 577.56 |
| एकूण सेवक | 132 |
| खेळता निधी | 37872.47 |

# संस्थापक अध्यक्षांचे मनोगत...

**मा.सभासद बंधु भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या १५ व्या वार्षिक सर्व साधरण सभेत आपले मन:पूर्वक स्वागत करतो १५ वर्षाचा कालावधी हा संस्थेच्या जीवनात फार मोठा नसतो पण फार लहानही नाही, या कालावधीत संस्थेने चांगली प्रगती केली आहे यात शंका नाही, पण याही पेक्षा जास्त प्रगती करता आली असती हे ही नक्की. २०२५-२६ हे वर्ष सर्व क्षेत्रासाठी आव्हानात्मक राहीले आहे. तरी या परिस्थितीत संस्थेच्या सर्व शाखा नियमित संस्थेच्या सभासद खातेदारांना सेवा पुरवण्याचे काम कर्मचारी व प्रतिनिधी यांनी केले. काम करत असताना व समाजामध्ये मल्टीस्टेट पतसंस्थाना पुरक वातावरण नसताना देखील सर्व कर्मचारी व संस्थेच्या प्रतिनिधींनी सभासदांना सेवा पुरविल्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो व त्यांची संस्थेच्या प्रति असणारी आपलूकी व योगदानाचे कौतूक करू इच्छितो.

मागील दोन- तीन वर्षापासून अनेक संस्था आर्थिक आडचणीत आल्या त्याचा परीणाम संपूर्ण व्यापारी,बाजारपेठ, व इतर सर्व क्षेत्रात पहायला दिसून आला त्यामूळे संस्थेने अपेक्षित वसूली झाली नाही. निश्चितच २०२५-२६ हे साल बॅकींग क्षेत्रासाठी आव्हाणात्मक ठरले आहे.

संस्थेने सभासदांना दर्जेदार,पारदर्शक व विश्वासार्ह आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्याचे ध्येय कायम ठेवले आहे. ठेवींची वाढ,कर्जवाटप,कर्जवसूली, आर्थिक शिस्त, सभासद सेवा आणि तांत्रिक आधूनिकीकरण यावर विशेष भर देण्यात आला. संस्थेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम करण्यासाठी संचालक मंडळाने दूरदृष्टीने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. संस्थेच्या प्रगतीच्या वाटचालीस गूरूवर्य,महिला,माता, भगिनी,बंधू सभासद, खातेदार, पत्रकार, डॉक्टर,, प्राध्यापक, वकील लोकनेते,व्यापारी, हितचिंतक,संचालक , कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी, यांचे योगदान राहीले आहे.

थकीत कर्ज वसूलीसाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात आल्या त्याच बरोबर सभासदांना आवश्यकतेनूसार कर्जपूरवठा करून त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावण्यात आला. संस्थेने कायदेशीरतरतूदीचे पालन,पारदर्शक प्रशासन आणि सूयोग्य वित्तीय व्यवस्थापन याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

या कालावधीत संस्थेने डीजीटल सेवा, प्रशासकीय सूधारणा,कर्मचारी प्रशिक्षण,ग्राहकाभिमूख सेवा आणि कार्यपद्धतीमध्ये गूणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपकृम राबविले, बदलत्या आर्थिक परिस्थितीतही संस्थेने स्थिरता आणि विश्वासार्हता कायम राखली आहे.

भविष्यातही संस्थेचा विस्तार आर्थिक बळकटी, आधूनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर, सभासद केंद्रित सेवा,मजबूत कर्जवसूली,जोखीम व्यवस्थापन आणि उत्तम कॉपरेट गव्हर्नन्स यावर विशेष भर दिला जाईल. संस्थेला देशातील आर्दश मल्टीस्टेट सहकारी संस्थामध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

आपल्या सर्वाच्या अखंड विश्वास प्रेम,आणि सहकार्याबद्दल मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. भविष्यातही आपण असेच सहकार्य कराल, असा मला पूर्ण विश्वास आहे. आपल्या सहकार्याच्या बळावर संस्था अधिक सक्षम प्रगत आणि यशस्वी होईल,हीच आपेक्षा.



**सहकाराबद्दल बोलू :-**

सर्व सामान्याची सहकारी चळवळ ही सर्वागिण आर्थिक प्रगतीची चळवळ आहे. त्यामधून अनेक प्रकारच्या संस्था निर्माण होवून समाजाचे एक अंग बनले आहे. परंतु लोकांना सहकारी चळवळ चांगल्या प्रकारे न समजल्यामुळे सभासदांनी धोका पत्कारून संस्थेस धोक्यात आणले आहे. जादा व्याजाच्या मोहापोटी जादा व्याज देणाऱ्या संस्थांनी ठेवी ठेवून धोका पत्कारून सहकारास बदनाम केले आहे. वेळीच दक्षता घेवून व्यवहार केले तर सहकार क्षेत्रात बदनाम झाले नसते. ९० टक्के चांगल्या बाबींचा

**पुढील पानावर...**

# संस्थापक अध्यक्षांचे मनोगत...

उहापोह न होता १० टक्के वाईट बाबींमुळे संपूर्ण सहकार चळवळच बदनाम होवून त्यासाठीचे काळे कायदे तयार होत आहेत. या कायद्यांच्या अभ्यास करता निश्चितच सहकार क्षेत्र बंद पडल्याशिवाय राहणार नाही. पतसंस्थाच्या बाबतीत कडक कायदे सेवा सहकारी सोसायटीचे बाबतीत वैद्यनाथन समितीच्या द्वारे होऊन भविष्यात निश्चितच अडचणीत आणणारे बाबी आहेत. त्यापेक्षा सहकारात प्रबोधन होणे गरजेचे आहे. सहकारातील प्रत्यक्षात अनुभव असा आहे की,सत्यमेव जयते म्हणण्यापेक्षा सहकारातील शक्तीमेव जयते असे दिसून येते. जस जसे नवनविन निकष अंमलात येतात तस तसे पतसंस्था बाबतची परिस्थिती अधिकाधिक चिघळत जाण्याचा धोका दिसतो आहे. अर्थातच पतसंस्थेचे अस्तित्व धोक्यात येईल. व त्याचा दीर्घ कालीन विपरीत परिणाम अर्थ कमकुवत होईल व सर्व सामान्य माणूस, तळागाळातला याचा कोणी बाकी वारस राहणार नाही. माझ्या दृष्टीने तो दिवस एक शोकांतिकेचा असेल, म्हणूनच या प्रश्नाविषयी सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी, तज्ञांनी याबद्दल विचार मंथन करावे. त्यासाठी मा. सहकार मंत्री श्री बाळासाहेब पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्री अण्णासाहेब हजारे, सहकारातील अनुभवी व तज्ञ श्री काकासाहेब कोयटे, मा.ॲड. सूरेशजी वाबळे यांनी माजलगांव येथे सहकारातील अडचणी व सभासदाच्या कर्तृत्वाच्या बाबतीत प्रबोधनसाठी सहकार परीषद चर्चासत्राचे दोन दिवसीय शिबीर आहेत. त्यामध्ये सर्व सहकारी पद पदाधिकारींचे मत विचारात घेवून सहकारी चळवळ ही सर्वसामान्याची चळवळ रहावी, ही सहकारी चळवळ भांडवलदाराच्या हाती जाऊ नये एवढया बाबतीत जरी थोडा विचार झाला तरी नेहरू गांधीचे स्वप्न पूर्ण झाल्याचे समाधान मिळेल. अशी नम्र सूचना करावीशी वाटते.

आपल्या मल्टीस्टेटला चालू वर्षामध्ये देखील सहकार क्षेत्रात मानला जाणारा पुरस्कार दीपस्तंभ व बॅको पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले. त्यामूळे बँकेची पारदर्शकता अधोरेखित झालेली आहे. तसेच आपल्या संस्थेचे सीईओ यांच्या सहकारातील कार्याची दखल घेत पुन्हा एकदा नॅशनल फेडरेशनच्या संचालक पदी नियुक्ती झाली असून त्यांना सलग दुसऱ्या वर्षी उत्कृष्ट सी.ई.ओ. चा पुरस्कार मिळाला आहे. तरी यामूळे संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला असून त्यामूळे संस्था अधिकच जोमाने नवनवीन यश शिखरांना पादाक्रांत नक्कीच करेल याचा मला विश्वास वाटतो.

आजच्या सभासदांनी पैशावर विश्वास न ठेवता विश्वासावर पैसा ठेवून आमच्यावर विश्वास दर्शविला त्या विश्वासास आम्ही निश्चितच पात्र राहून वचन देतो की, कोणत्याही ठेविदाराची ठेविची रक्कम माझ्या संस्थेतून व्याजसह वेळेवर मिळालीच पाहिजे, एवढी ग्वाही देतो. व असेच सहकार्य सर्व सभासदांनी पुढे ठेवावे व पुनश्च आभार मानतो व माझे सहकारातील अनुभवाचे विचार पूर्ण करतो. खूप स्वप्ने आहेत, पूर्ण करण्याचे मजबूत इरादेही आहेत. स्वप्न आणि पूर्तता यामधील अंतर पार करुन ते स्वप्न साकारणार आहोत. घर तेथे श्री मंगलनाथ मल्टीस्टेट जावी यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे. १५ वा वार्षिक अहवाल आपणा समोर मांडतांना मला निश्चित आनंद होत आहे. आपण आम्हा संचालक मंडळास उत्तम सहकार्य करतच आहात, असेच पुढेही करावे, ही अपेक्षा बाळगतो.

**धन्यवाद...!**



आपला स्नेहांकीत

**मा.आर.जी कानडे**

संस्थापक अध्यक्ष,श्री मंगलनाथ मल्टीस्टेट
को–ऑप क्रेडीट सोसायटी लि.(महाराष्ट्र व कर्नाटक)

३१ जुलै २०२६ अखेर

# 220+ कोटी

## गोल्डलोनसह

# 650+ कोटी

## व्यवसायाचा यशस्वी टप्पा पार

विश्वासाची दिशा...
प्रगतीची नवी भरारी...




गेल्या 26 वर्षापासून अविरत व उत्तम बँकींग सेवा.



महाराष्ट्रातील 4 जिल्ह्यांमध्ये व कर्नाटकमध्ये मिळून 14 शाखांचा विस्तार




26 वर्षापासून लेखापरिक्षण वर्ग अ आहे.




संस्थेद्वारे 92% सुरक्षित व कर्ज वाटप.



150+ संस्थेचा कर्मचारी वर्ग उच्च प्रशिक्षित व अनुभवी आहे.



प्रत्येक सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायं.७

# संचालक मंडळाचा अहवाल...

सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,
स.न.वि.वि.

समाजातला सामान्य माणूस केंद्र मानून व त्याच्या आर्थिक विकासातच समाजाचा पर्यायाने देशाचा विकास आहे. हे तत्त्व लक्षात घेऊन दि. ०४ एप्रिल २०११ रोजी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.महाराष्ट्र व कर्नाटक स्थापना करण्यात आली. अल्पावधीतच नाविन्यपूर्ण योजनांचा सहकार क्षेत्रामध्ये कौशल्याने वापर करून पतसंस्थेने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्याचेच प्रत्यंतर म्हणून मराठवाडा विभागात अग्रगण्य पतसंस्था म्हणून पतसंस्थेचा नावलौकिक झाला आहे.

सद्य परिस्थिती लक्षात घेता बँकिंग व्यवसाय अत्यंत गुंतागुंतीचा, नव्या घडामोडींचा, तीव्र स्पर्धेचा व सहकार खात्याच्या नवनवीन नियमांना सामोरे जाण्याचा आहे. या सर्व अडचणींना तोंड देऊन पतसंस्थेने अल्पावधीतच नेत्रदीपक कामगिरी केली आहे. त्याच्याशी सर्वजण सहमत होतील यात शंका नाही.

आता आपण १४ वर्षे पूर्ण केलेली आहेत. हा काळ तसा संस्थेच्या दृष्टीने मोठा काळ नाही पण लहानही नक्कीच नाही. पहिल्या १४ वर्षात आपल्या झालेल्या प्रगतीच्या पार्श्वभूमीवर मागील वर्षातील लक्षवेधी प्रगती लगेच जाणवते. झालेल्या प्रगतीचे विश्लेषण करता संस्थेने जनसामान्यात मानाचे स्थान मिळविले असून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. तसेच प्रामाणिकपणा, कौशल्य, विश्वास व ग्राहक सेवा हा आमचा प्रगतीचा मंत्र आहे. या बळावरच आपण १५ वर्षात यशस्वी प्रगती केलेली आहे. याचा मला अभिमान वाटतो.

संस्थेच्या १५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेच्या निमित्ताने अध्यक्षा या नात्याने संक्षिप्तरित्या अहवाल सादर करणे क्रमप्राप्त समजून प्रथमत: आपण सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करून आणि संस्थेच्या १५ व्या वार्षिक अहवालास मान्यता मिळावी म्हणून संचालक मंडळाद्वारे आपल्या मान्यतेसाठी सादर करते.

**- सौ.जे.आर. कानडे**
अध्यक्षा,श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट
सोसायटी लि.(महाराष्ट्र व कर्नाटक)

**सभासद** पतसंस्थेचा सभासद संख्येत दरवर्षी वाढ होत आहे. अहवाल वर्षा अखेर सभासदांची संख्या 36216 आहे.

**भागभांडवल**
संस्थेचे अधिकृत भागभांडवल मर्यादा रूपये 30 कोटी असून मार्च 2026 अखेर 103557400.00 एवढे होते. त्यामध्ये 6666500.00 ने वाढ होऊन वर्षाअखेरीस संस्थेचे भागभांडवल रक्कम रुपये 111490400.00 एवढे आहे. (वाढ 07.66%)

**राखीव निधी व इतर निधी**
संस्थेकडे मार्च 2025 अखेर राखीव निधी व इतर निधी 166863638.29 ऐवढा निधी होता. वर्षभरात सदर निधीमध्ये 37255029.73 ने वाढ होऊन मार्च 2026 अखेर संस्थेकडे 204118668.02 एवढा राखीव निधी आहे. (वाढ 22.32 %)






सहकारातून समृद्धीकडे...

## ठेवी

संस्थेकडे मार्च 2025 अखेर 2658565890.33 ऐवढया ठेवी होत्या अहवाल वर्षामध्ये 370168064.15 रक्कमेच्या ठेवीची वाढ होऊन 2026 वर्षा अखेरीस संस्थेकडे 3028733954.48 एवढया ठेवी शिल्लक आहे.

(वाढ 13.92%)

## कर्ज व्यवहार

पतसंस्थेने कर्ज क्षेत्रात प्रामुख्याने सूशिक्षीत बेराजगार, तरूण, होतकरू, व्यावसायिक यांना प्राधान्य दिले आहे. रितीपेक्षा व्यक्तीला महत्व देवून व कारणापेक्षा तारणाला महत्व देवून संस्थेने कर्जवाटप केले असून 31/03/2026 अखेर एकूण कर्ज येणे रू 2516614090.00 येणे बाकी आहे.

## वसुली व्यवहार

पतसंस्थेने कर्ज दिलेल्या कर्जाची थकबाकी कमीत कमी रहावी हा संचालक मंडळाचा नेहमीच प्रयत्न असतो, संस्थेचे सर्व कर्मचारी यांनी प्रत्येक कर्जदार थकबाकीत जाऊ नये यासाठी प्रयत्नशील असतात व संस्थेने सक्तीने कायदेशीर वसूली करण्यासाठी स्वतंत्र विशेष वसूली अधिकारी व विक्री अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. सर्व कर्जदार सभासद कर्ज परतफेड संदर्भात सहकार्य करतील हीच अपेक्षा.

## गुंतवणुक

संस्थेची गूंतवणूक व त्यापासून मिळणारे उत्पन्न हे संस्थेचे आर्थिक स्थैर्य व नफा क्षमता ठरविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची भुमिका बजावतात. ठेवीमधील तरलतेपोटी करावयाची गूंतवणूक राखीव निधी, मूदत ठेव यांची गूंतवणूक सुरक्षीत व फायदेशीर व्हावी याकडे संचालक मंडळाने लक्ष दिले आहे. मार्च 2025 अखेर संस्थेची विविध बॅकामध्ये एकूण 1024295709.00 एवढया रक्कमेची गूंतवणूक होती. अहवाल वर्षामध्ये त्यात रक्कम रूपये 49966715.00 या रक्कमेची गूंतवणूक घट होऊन अहवाल वर्षामध्ये संस्थेची एकूण गूंतवणूक 974328994.00 एवढी आहे (घट 04.87 %)

## तपासणी/लेखा परिक्षण

1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या काळाचे लेखा परिक्षण श्री सूगावे महेश (चार्टेड अकांउटंट) लातूर यांनी केले आहे आणि संस्थेस **अ वर्ग** मिळाला आहे.

## नफा व त्याची वाटणी

अहवाल वर्षात ढोबळ मानाने 430121533.85 इतके उत्पन्न झाले असून खर्च रूपये 372364936.34 खर्च वजा जाता निव्वळ नफा रू.57756597.51 झाला आहे संचालक मंडळाने पोटनियमातील तरतूदी नूसार खालीलप्रमाणे नफा वाटप केला आहे. संस्थेने स्थापनेपासून सभासदांना लाभांश दिला आहे. सतत लाभांश देणारी राज्यातील एकमेव संस्था होय. सभासदांनी दिला सहकार्याचा हात म्हणून त्यांना लाभांश 12% आम्ही सर्वाच्या सहकार्याने देत आहेत.

| | |
|---|---|
| १. राखीव निधी (Reserve Fund) | 14439149.00 |
| २. शिक्षण निधी (Education Fund) | 577566.00 |
| ३. देणगी निधी (Donation Fund) | 1155132.00 |
| ४. लाभांश वाटप (Dividend Fund) | 13378848.00 |
| ५. प्रशिक्षण निधी (Traning Fund) | 1155132.00 |
| ६. इमारत निधी (Bulding Fund) | 21852676.51 |
| ७. कर्मचारी कल्याण निधी (Employee Walefare Fund) | 1155132.00 |
| ८. लाभांश समतुल्य निधी (Dividend Equalisation Fund) | 2887830.00 |
| ९. धर्मादाय निधी | 577566.00 |
| १०.सहकार शिक्षण निधी (CoOperative Education Fund) | 577566.00 |

## सामाजिक उपक्रम

यापूर्वीच वेळोवेळी संस्थेने सामाजिक उपक्रमाद्वारे विना संस्कार नाही सहकार हे दाखवून दिले आहे. संस्थेद्वारे दरवर्षी प्रमाणे श्री तपोरत्न प्रभूपंडीताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या आशिर्वादाने राबवित आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी.कानडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपन करण्यात आले व मराठवाडा विभागातून सर्वात जास्त रक्त दान करण्याचा विक्रम संस्थेच्या नावे झाला असून त्याबद्दल घाटी रुग्णालय छ.संभाजीनगर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा विशेष सत्कार घाटी रुग्णालयात केला. महिला सभासदांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीराचे आयोजन करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ माजलगांव सिटी व श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या संयुक्त विद्यमाने लहान मुलांसाठी स्पर्धा परिक्षांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांना 'नेशन बिल्डर' अवार्डने सन्मानीत करण्यात आले. तसेच विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा 'नवदुर्गा पुरस्कार' देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच वृक्षारोपन कार्यक्रम, गरजुंना सायकल वाटप करणे त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने व्यापारी बांधवांना पर्यावरण पुरक पिशव्यांचे वाटप करण्यात आले. जागतिक योग दिनानिमित्त योग शिबीर घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञान विकासासाठी पिएमश्री जि.प.कन्या प्रशाला माजलगाव येथे संगणक संच देण्यात आला. तसेच कन्या प्रशाला माजलगाव येथील व्हॉलीबॉल संघाला संपूर्ण स्पोर्ट किटचे वाटप करण्यात आले. महिलांना बचतीसह आर्थिक सक्षम बनविण्याकरीता विविध गावांमध्ये महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली. माजलगांव येथील वीर शैव समाज सामुहिक विवाह सोहळयात 5 जोडप्यांच्या विवाहसोहळयाचे आयोजन करण्यात आले. शाळकरी मूलांना संगणक,टी.व्ही. दफ्तरे व इतर आवश्यक साहीत्य वाटपाचे उपक्रम संस्थेद्वारे घेण्यात आले.

अश्याप्रकारे संस्था सभासद, ग्राहक व हितचिंतकाच्या अपेक्षेस पात्र ठरून निश्चितच उत्तरोतर विकास करत राहील व संस्थेच्या जमा शेअर्स ला यावर्षीप्रमाणे दिलेला लाभांष यापूढेही देण्याचा प्रयत्न करून सभासदांच्या हितासाठी नेहमीच कार्यरत राहील याची ग्वाही या सभेच्या निमित्ताने देवून सदरील सभा पूर्ण झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

# AUDITED BALANCE SHEET

As On31ST MARCH, 2026

| | Particulars | Schedule | As on 31st March, 2025 | As on 31st March, 2026 |
|---|---|---|---|---|
| **I.** | **SOURCES OF FUNDS** | | | |
| **(1)** | **LIABILITIES** | | | |
| (a) | Capital | I | 103557400.00 | 111490400.00 |
| (b) | Reserves & Surplus | II | 166863638.29 | 204118668.02 |
| (c) | Deposits from members | III | 2658565890.33 | 3028733954.48 |
| (d) | Other Liablities & Provision | IV | 288846555.24 | 442904789.40 |
| | **Total** | | **3217833483.86** | **3787247811.90** |
| **II.** | **APPLICATIONS OF FUNDS** | | | |
| (a) | Investments | VI | 1024295709.00 | 974328994.00 |
| (b) | Loan to Members | VII | 2015374008.70 | 2516614090.42 |
| (c) | Cash and Bank Balances | VIII | 94277556.64 | 105999067.04 |
| (d) | Other Current Assets | IX | 176379145.00 | 190305660.44 |
| | **Total** | | **3310326419.34** | **3787247811.90** |
| | | | | |

Statement of Income and Expenditure for the year ended March 31, 2026

*Amount in (Rs.)*

| | Particulars | Schedule | As on 31st March, 2025 | As on 31st March, 2026 |
|---|---|---|---|---|
| **I.** | **INCOME** | | | |
| (a) | Direct Income | X | 439048429.70 | 420367914.15 |
| (b) | Other Income | XI | 861868.03 | 9753619.7 |
| | **Total Income (A)** | | **439910297.73** | **430121533.85** |
| **II.** | **EXPENDITURE** | | | |
| (a) | Employee Benefits | XII | 37552920.00 | 41119955.00 |
| (b) | Interest Expenses | XIII | 267684417.42 | 257166458.84 |
| | Operating Expenses & others | XIV | 67127598.92 | 90263204.89 |
| | **Total Expenditure (B)** | | **372364936.34** | **388549618.73** |
| | | | | |
| **III** | **Profit & Loss (A-B)** | | **51360679.00** | **57756597.51** |

| Chairman | Vice Chairman | CEO | Auditor |
|---|---|---|---|
| Jaydevi R.Kanade | Narayan M. Jadhav | Ravindra R.Kanade | CA Mahesh Sugave |

## Balance Sheet As on 31st March, 2026

| Liabilities | Amount | Assets | Amount |
|---|---|---|---|
| **Authorized Share Capital** | **30,00,00,000.00** | | |
| Capital Funds | 111490400.00 | Cash in Hand | 27005685.00 |
| Funds | 204118668.02 | Bank Balance in Current A/c | 78993382.04 |
| Deposits | 2654474681.00 | Investments | 974328994.00 |
| Demand Liabilities | 374259273.48 | Loan's | 2516614090.42 |
| Other Libilities | 49769078.73 | Receivables | 84231579.10 |
| Provision's >> Interest | 176742073.00 | Dead Stock | 85136631.21 |
| Provision's >> Others | 158637040.16 | Other Asset | 20937450.13 |
| Profit and Loss | 57756597.51 | | |
| **Total** | **3,78,72,47,811.90** | **Total** | **3,78,72,47,811.90** |

## Profit and Loss As on 31st March, 2026

| Expense | Amount | Income | Amount |
|---|---|---|---|
| Interest Paid on Deposit | 267684417.42 | Interst Received | 42,03,67,914.15 |
| Commission Exchange and Brokerage | 10225872.00 | Miscellaneous Income | 12,31,437.70 |
| Staff Expences | 37552920.00 | Rent, Taxes, Insurance and Lighting | 85,22,182.00 |
| Auditor’s Fees | 710000.00 | | |
| Rent, Taxes, Insurance and Lighting | 10950268.36 | | |
| Law Charges | 3637705.00 | | |
| Postage, Telegrams and Stamps | 622999.90 | | |
| Stationary, Printing and Advertising | 4675005.86 | | |
| Depreciation and Repairs to | 10038044.02 | | |
| Other Expence | 25003624.78 | | |
| General Body Meeting Expense | 1264079.00 | | |
| **Total Expence** | **37,23,64,936.34** | **Total Income** | **43,01,21,533.85** |
| **Net Profit** | **5,77,56,597.51** | **Net Loss** | **0.00** |
| **Total** | **43,01,21,533.85** | **Total** | **43,01,21,533.85** |

| Chairman | Vice Chairman | CEO | Auditor |
|---|---|---|---|
| Jaydevi R.Kanade | Narayan M. Jadhav | Ravindra R.Kanade | CA Mahesh Sugave |

## उत्पन्नाचा तपशिल




- कर्जावरील वसुल व्याज (३३ कोटी ७१ लाख)
- बँक गुंतवणुकीवरील प्राप्त व्याज (९ कोटी १९ लाख)
- इतर उत्पन्न (१२ लाख)

## १ रुपयाचा विनियोग




- इतर खर्च
- नफा
- व्यवस्थापकीय खर्च
- ठेव व्याज

| इतर खर्च व तरतुदी | नफा | व्यवस्थापकीय खर्च | ठेव व्याज |
|---|---|---|---|
| ६ कोटी ७२ लाख | ५ कोटी ७७ लाख | ३ कोटी ७५ लाख | २६ कोटी ७७ लाख |

## तारणानुसार कर्ज विगतवारी




- ठेव, सोनेतारण, वेअरहाऊस कर्ज
- तारणी कर्ज
- विनातारणी कर्ज

## व्याजदरानुसार ठेव विगतवारी




- कमी व्याजदराच्या ठेवी 0 ते 6%
- मध्यम व्याजदराच्या ठेवी 7 ते 10%
- जास्त व्याजदराच्या ठेवी 10% ते 11.50%

# संस्थेला मिळालेले गौरवशाली पुरस्कार

- **उत्कृष्ट मल्टीस्टेट पुरस्कार २०१५**
  १०० कोटी ठेवी गटात उत्कृष्ट मल्टीस्टेट पुरस्कार गोवा राज्याचे सहकार व उद्योग मंत्री मा.श्री.महादेवजी नाईक साहेब यांच्या हस्ते स्विकारण्यात आला.

---

- **राज्यस्तरीय बँको पुरस्कार**
  अविज पब्लिकेशन कोल्हापूर व गॅलेक्सी एनमा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा राज्यस्तरीय बँको पुरस्कार
  २०१४ - ठेवी रु.५० कोटी पर्यंतचा विभागात द्वितीय क्रमांक.
  २०१५ - ठेवी रु.५० कोटीच्यावर विभागात द्वितीय क्रमांक.
  २०१६ - ठेवी रु.२० ते ७५ कोटी पर्यंतचा विभागात तृतीय क्रमांक.
  २०१८ - ठेवी रु.५० ते १०० कोटी पर्यंतचा विभागात प्रथम क्रमांक.
  २०१९ - ठेवी रु.५० ते १०० कोटी पर्यंतचा विभागात प्रथम क्रमांक.
  २०२० - ठेवी रु.१०० ते २५० कोटी पर्यंतचा विभागात तृतीय क्रमांक.

---

- **सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार २०१७**
  २०१७ चा सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार सहकारमंत्री मा.सुभाष देशमुख, विधानसभेचे विरोधी पक्षनेते मा.राधाकृष्ण विखे पाटील, विधानसभा सभापती मा.हरिभाऊ बागडे, सहकार आयुक्त मा.चंद्रकांतजी दळवी, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, पोपटराव पवार यांच्या हस्ते स्विकारण्यात आला.

---

- **राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार २०२०**
  सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.च्या वतीने दिला जाणारा दीपस्तंभ पुरस्कार २०२० स्विकारण्यात आला.

---

- **बेस्ट सि.ई.ओ.पुरस्कार २०१८** राष्ट्रीय मल्टीस्टेट फेडरेशन तर्फे दिला जाणारा संपूर्ण भारतातून बेस्ट सि.ई.ओ. पुरस्कार संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक मा.रविंद्रजी कानडे साहेब यांना मिळाला.

---

- **आर्थिक क्रांती पुरस्कार २०२२** चर्मकार महासंघाच्या वतीने दिला जाणारा आर्थिक क्रांती पुरस्कार संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक मा.रविंद्रजी कानडे साहेब यांना मिळाला.

---

- **सहकाररत्न पुरस्कार** माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने प्रदान.

---

- **माजलगाव भूषण पुरस्कार** सा.माजलगाव परिसरच्या वतीने मा.आर.जी.कानडे यांना प्रदान.

---

- **सहकार गौरव सोहळा : सर्वोत्कृष्ट संस्था २०२२** फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को.ऑप.क्रे.सो.लि.पुणे यांच्या वतीने प्रदान.

---

- **राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार २०२२** सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.च्या वतीने प्रदान.

---

- **शिवपुत्र महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२३** शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे बहुउद्देशीय संस्था नाशिक यांच्या वतीने प्रदान.

---

- **जीवन गौरव पुरस्कार २०२५** महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या वतीने मा.श्री.राधेश्यामजी चांडक यांच्या अमृतमहोत्सवा निमित्त मा.आर.जी.कानडे साहेब यांना प्रदान

---

- **ग्रीन वर्ल्ड २०२५** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनच्या वतीने संस्थेस प्रदान

---

- **समाजभूषण पुरस्कार २०२६** लिंगायत महासंघ,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ॲड.रविंद्रजी कानडे साहेब यांना प्रदान

---

- **सकाळ उद्योग समुहातर्फे गौरव** सहकारातून समृद्धीकडे कॉफी टेबल बुकच्या प्रकाशन सोहळ्यात संस्थेचा गौरव





राज्यात नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक सुरक्षित, सक्षम व पारदर्शक करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशी सुधारणा कराव्यात या संबंधी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची भेट घेण्यात आली. याप्रसंगी पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पा. मुंबई जि.म.सह.बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, रा.सह.प.फेडरेशनचे कार्याध्यक्ष ओमप्रकाश (काका) कोयटे, राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश साबळे, संचालक ॲड.रविंद्र कानडे, शिवाजीराव कपाळे, कडूभाऊ काळे, व इतर मान्यवर.



राज्यात नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक सुरक्षित, सक्षम व पारदर्शक करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशी सुधारणा कराव्यात या मागणीसाठी दिल्ली येथे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा.मुरलीधर मोहोळ यांनाही निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सहकार क्षेत्रातील उपस्थित मान्यवर.

उद्योजकांना नेटवर्किंग, व्यवसाय संधीव मार्गदर्शन देण्यासाठी कटिबद्ध असलेल्या बी.सी.एन.सर्कलच्या संचालक पदी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक मा.ॲड.रविंद्रजी कानडे साहेब यांची निवड करण्यात आली.
याप्रसंगी ज्येष्ठ उद्योजक मा.भावेश भाटिया, संस्थापक मा.अतुल ठाकुर, मा.अमरिश देशपांडे व इतर मान्यवर.






सकाळ उद्योग समुहातर्फे आयोजीत सहकारातून समृद्धीकडे कॉफी टेबल बुकच्या प्रकाशनसोहळ्यात राज्याचे ओबीसी कल्याणमंत्री मा.अतुलजी सावे यांच्याहस्ते श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला,याप्रसंगी उपस्थित संस्थेचे व्यवस्थाकीय संचालक ॲड.रविंद्रजी कानडे साहेब व इतर मान्यवर.

महाराष्ट्र रजाय सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या संयुक्त विद्यमाने आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राधेशाम चांडक च्या अमृत महोत्सवा निमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आर.जी.कानडे साहेब यांना मा.राधाकृष्णजी विखे पा. यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले याप्रसंगी उपस्थित ॲड.रविंद्र कानडे, डी.डी.भिसे व इतर मान्यवर



संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक
मा.ॲड.रविंद्र कानडे साहेब यांना लिंगायत महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने तुळजापुर येथे समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रविंद्रजी कानडे साहेब व उपस्थित इतर मान्यवर...






आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने कॉसमॉस बँक व ग्रीन वल्ड पब्लिकेशन यांच्या वतीने पुणे येथे आयोजीत करण्यात आलेल्या सहकार मंथन कार्यक्रमात श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ला ग्रीन वर्ल्ड २०२५ हा मानाचा पुरस्कार सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रविंद्रजी कानडे साहेब, चिफ जनरल मॅनेजर डी.डी.भिसे, राहुल काटकर व मान्यवर

महात्मा बसवेशवर समता परिषद महाराष्ट्र आयोजीत भव्य बसव परिषद नांदेड येथे श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे चेअरमन श्री.आर.जी.कानडे साहेब यांना राष्ट्रसंत प.पू.डॉ.शिवलींग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या हस्ते बहुजनरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



**बँको पतसंस्था पुरस्कार सन २०१५** (१०० कोटी गट) गोवा राज्याचे सहकार व उद्योग मंत्री **मा.महादेव नाईक** साहेब यांच्या हस्ते स्विकारतांना संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक **श्री.रविंद्र कानडे साहेब**







१ ऑगस्ट रोजी महसूल दिनानिमित्त सामाजिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल **श्री मंगलनाथ मल्टीस्टेट** चे **व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे** यांचा सत्कार बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी **श्रीमती दीपा मुधोळ मुंडे (आयएएस)** यांच्या शुभ हस्ते करण्यात आला ... याप्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी **आदित्य जीवने (आयएएस)** निवासी जिल्हाधिकारी **शिवशंकर स्वामी,** उपजिल्हाधिकारी **श्रीमती नीलम बाफना** मॅडम व तहसीलदार **श्रीमती मनाळे मॅडम** व जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते....

**बँको पतसंस्था पुरस्कार सन २०१६** कॉसमॉस बँकेचे चेअरमन **मा.मुकूंद अभ्यंकर** बँकोचे **मा.अशोक नाईक** व **मा.अविनाश शिंत्रे** यांच्या हस्ते स्विकारतांना संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक **रविंद्र कानडे** व संचालक **विनोदजी वीर**



सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार २०१७
सहकारमंत्री **मा.सुभाष देशमुख,**
विरोधी पक्षनेते **मा.राधाकृष्ण विखे पाटील**
विधानसभा सभापती **मा.हरिभाऊ बागडे**
सहकार आयुक्त **मा.चंद्रकांत दळवी,**
ज्येष्ठ समाजसेवक **मा.अण्णा हजारे,**
**मा.पोपटराव पवार** यांच्या हस्ते
स्विकारतांना संस्थेचे अध्यक्ष
**आर.जी.कानडे साहेब**






**राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार २०२०**
पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष
**मा.काकासाहेब कोयटे** यांच्या हस्ते
स्विकारतांना श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे
व्यवस्थापकीय संचालक **रविंद्र कानडे**
**नारायण शेंडगे, सत्यविजय कुलकर्णी,**
**सचिन कैलासे, प्रविण हालकुडे,**
**रुपेश पांचाळ**

**राज्यसभेचे खासदार डॉ.अजितजी गोपछडे साहेब यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयास भेट दिली, त्याप्रसंगी सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष मा.आर.जी.कानडे साहेब, तसेच संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक मा.रविंद्र कानडे, संचालक मा.पशुपती गवरकर व जनरल मॅनेजर नारायण शेंडगे**



**सहकार गौरव सोहळा, सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार** पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष **मा.काकासाहेब कोयटे साहेब** यांच्या हस्ते स्विकारतांना संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक **श्री.रविंद्र कानडे,** संस्थेचे वरिष्ठ अधिकारी **सचिन कैलासे, राहुल काटकर, अमोल पांडे.**







**शिवपुत्र महाराष्ट्र गौरव पुरस्कार शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे बहुउद्देशीय संस्था नाशिक यांच्या वतीने**
प्रसिद्ध व्याख्यानकार **मा.श्री.नितीन बानगुडे, वीरमाता सौ.मांडवगणे, सौ.प्रज्ञाताई पाटील** यांच्या हस्ते स्विकारतांना संस्थेचे यवस्थापकीय संचालक **श्री.रविंद्र कानडे समवेत कानडे परिवार**

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या मुख्य कार्यालयास बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष **मा.राधेश्यामजी चांडक (भाईजी)**, पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष **मा.काकासाहेब कोयटे** यांच्याशी संस्थेच्या प्रगतीविषयी बोलतांना संस्थापक अध्यक्ष **आर.जी.कानडे,** व्यवस्थापकीय संचालक **रविंद्रजी कानडे**



राष्ट्रीय फेडरेशन यांच्यातर्फे दिला जाणारा नॅशनल अवॉर्ड २०१७ सर्वोत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी हा पहिला राष्ट्रीय पुरस्कार दिल्लीचे सेंट्रल रजिस्ट्रार **मा.डॉ.सय्यद हसन** यांच्या हस्ते व पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष **मा.काकासाहेब कोयटे,** फेडरेशन अध्यक्ष **मा.सुरेशजी वाबळे साहेब,** फेडरेशनचे सचिव **ॲड.गडगे साहेब** यांच्या उपस्थितीत स्विकारतांना श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक **ॲड.रविंद्रजी कानडे**






माजलगाव येथील मार्केट यार्ड शाखेचे नविन सुसज्ज वास्तुमध्ये स्थलांतर करण्यात आले. यावेळी **पिठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ परमपूज्य चंद्रशेखर शिवाचार्य महाराज** यांनी भेट दिली असता त्यांचा आशिर्वाद घेतांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष **आर.जी.कानडे** व व्यवस्थापकीय संचालक **रविंद्रजी कानडे.**

राज्यव्यापी बसव महामेळावा २०१६ लातूर येथे माजी मुख्यमंत्री तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री **मा.श्री.सुशिलकुमारजी शिंदे,** मा.केंद्रीय गृहमंत्री **शिवराजजी पाटील चाकुरकर,** विधान परिषद विरोधी पक्षनेते **मा.धनंजयजी मुंडे** यांच्या हस्ते सन्मान स्विकारतांना चेअरमन **मा.आर.जी.कानडे साहेब**



# SHRI MANGALNATH MULTISTATE

CO-OP, CREDIT SOCIETY LTD. MAJALGAON DIST-BEED.

## Audit Report 01.04.2025 to 31.03.2026

1. I have audited the attached balance sheet of Shri. Mangalnath Multistate Co.op. Credit Society Ltd. Majalgaon Dist-Beed as at 31 st March 2026 and also the profit and Loss Account for the year ended on that date the preparation of financial statement is the responsibility of the Credit Co-Operative society/ its management. Our responsibilty is to express an opinion on these financial statement based on our audit.

2. I have conducted audit in accordance with the auditing standard generally accepted in India Those Standard require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the finincial statements are free from material misstatements. An Audit includes assessting the accounting principles used and significant estimates made by management, as well as evaluating the overall financial statements presentation. I believe that my audit provides a reasonable basis for my opinion.

3. Balance Sheet and Profit and Loss Account have been drawn up in accordance with prescribed forms under the MSCS Act, 2002 and Banking Regulation Act, 1949 ( as applicable to Co-Operative Societies and are in conformity with the accounting principles generally accepted in India.

4. Subject to limitation of the audit indicated in above para, the accounting policies and our separate report.
   a) I report that in my opinion and to the best of my knowledge and according to the information and explanations given to me and as shown by the books of the Credit Co-operative Society.
   i) The Balance Sheet is a full and fair Balance sheet containing the necessary particulars and is property drawn up so as to exhibit a true and fair view of the affairs of the credit co-operative society as at 31 st March 2026.
   ii) The Profit & Loss Account read together with accounting policies there on shown true balance of profit for the year ending on that date.
   b. I have obtained all the information and explanations, which to the knowledge and belief and to the extent possible were necessary for the purpose of my audit and have found them to be satisfactory.

Subject to my report of even date the Shri. Mangalnath Multistate Co.op. Credit Society Ltd. Majalgaon Dist-Beed is awarded classification **"A"** for the financial year 2025-2026.

**Place : Latur**
**Date : 21.07.2026**

**For M.U Sugawe & Associates**
**Charactered Accountants**

**CA Mahesh U Sugave**
**Proprietor**
**M.No. 127461**
**F.R.N.130971 W**
**UDIN: 26127461EWFRNL9697**

# मंगलनाथ परिवार...




## संस्थेची वैशिष्ट्ये

- संस्थेचे सॉफ्टवेअर CBS, Core Banking पारदर्शक आहे.
- संस्थेचे व्याजदर शासकीय नियमांनुसार आहे.
- अनेक शाखा संस्थेच्या स्वमालकीच्या इमारतीमध्ये आहेत.
- संस्था स्थापनेपासून नफ्यात असून संस्था अराजकीय आहे.
- शासनाच्या अंमलात आणलेल्या धोरणात संस्था काम करते.
- संस्थेचे अध्यक्ष शासकीय निवृत्त लेखापरिक्षक असून त्यांना ३५ वर्षाचा अनुभव आहे.
- संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी केंद्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट वरती संचालक आहेत,
- त्यांना २३ वर्षाचा अनुभव आहे तसेच उच्चशिक्षित आहेत.
- महाराष्ट्रात नामांकीत प्रथम १० संस्थांमध्ये आपली संस्था आहे.
- संस्थेला अनेक शासकीय, निमशासकीय संस्थांकडून उत्कृष्ट बँकींग सेवेसाठी पुरस्कार प्राप्त आहेत.
- प्रत्येक शाखेत अलार्म सिस्टम, इंटरनल कंट्रोलिंग, CCTV सिस्टीम, ट्रेनिंग, मिटींग, टार्गेट, इन्सेंटीव, PF आहे.
- प्रत्येक कर्मचारी यांना सेवा नियमावली व आरोग्य, अपघाती विमा संरक्षण.

## मान्यवरांच्या भेटी...

- **मा.पिठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ परमपूज्य**
- **चंद्रशेखर शिवाचार्य महाराज**
- **मा.प.पु.सद्गुरू माधवानंद स्वामी महाराज**
  (मठाधिपती, चिन्मय मूर्ती संस्थान, उमरखेड)
- **सू.श्री साध्वी वैष्णवी सरस्वती दिदिजी**
- **मा.समाधान महाराज शर्मा**
- **मा.खा.श्री.डॉ.अजित गोपछडे** (खासदार, राज्यसभा)
- **मा.खा.डॉ.प्रितमताई गोपीनाथ मुंडे** (मा.खासदार, बीड)
- **मा.श्री.धनंजयजी मुंडे** (आमदार, परळी वै. तथा माजी सामाजिक न्यायमंत्री)
- **मा.आ.प्रकाशदादा सोळंके** (आमदार, माजलगाव तथा माजी राज्यमंत्री)
- **मा.राधाकृष्णाजी होके पाटील** (माजी आमदार,माजलगांव)
- **मा.मोहनरावकाका सोळंके** (माजी आमदार, माजलगाव)
- **मा.मोहनदादा जगताप** (व्हा.चेअरमन,छ.स.सा.कारखाना)
- **मा.बाबुरावजी पोटभरे** (संस्थापक, बहुजन विकास मोर्चा)
- **मा.सुरेंद्रजी रेदासणी** (अध्यक्ष, मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्स)
- **मा.शिफा बिलाल चाऊस** (नगराध्यक्षा, माजलगाव)
- **मा.सहालभैय्या चाऊस** (उप नगराध्यक्ष,माजलगांव)
- **मा.अशोकजी डक** (माजी सभापती-मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती)
- **मा.राधेशामजी चांडक** (अध्यक्ष,बूलढाना अर्बन)
- **मा.काकासाहेब कोयटे**
  (अध्यक्ष-समता नागरी सह.पतसंस्था)
- **मा.ॲड.सूरेशजी वाबळे**
  (अध्यक्ष नॅशनल मल्टीस्टेट फेडरेशन नवी दिल्ली)
- **मा.अशोकशेट जैन** (अध्यक्ष वैद्यनाथ बँक)
- **मा.डॉ.सूकेश झंवर** (कार्यकारी संचालक बूलढाना अर्बन)
- **मा.श्री.सोमनाथअप्पा साखरे साहेब** (उदयोगपती, औरंगाबाद)
- **मा.श्री.विरेंद्रदादा सोळंके**
  (सूंदरराव सहकारी साखर कारखाना चेअरमन)
- **मा.श्री.जयसिंगभैय्या सोळंके**
  (सूंदरराव सहकारी साखर कारखाना व्हाईस चेअरमन)
- **मा.ॲड.भानूदासरावजी डक**
  (माजी अध्यक्ष-वकील संघ माजलगांव)
- **मा.ॲड.विश्वास जोशी**
  (कार्यवाह,श्री सिद्धेश्वर संकुलन, माजलगाव)
- **ॲड.अजित देशमुख** (अर्बिटेटर)

**यांनी भेटी देवून मार्गदर्शन केले व संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.**

# गोल्डन जुबली ठेव योजना

एकरक्कमी रक्कम गुंतवा व
४८ महिन्यानंतर मिळवा

## दामदिडपट

**आजच बचत करा...उद्याचा सुवर्णकाळ घडवा !**

सुरक्षित गुंतवणुक ● आकर्षक परतावा
नियमित बचत ● विश्वसनीय संस्था

योजना मर्यादीत कालावधीसाठी



## मुदत ठेव योजना

| | |
|---|---|
| 30 ते 90 दिवस | 7% |
| 91 ते 180 दिवस | 8% |
| 181 ते 365 दिवस | 9% |
| 366 दिवस ते पुढे | 10% |



**दामदुप्पट ठेव**
केवळ 90 महिने

**दामदिडपट ठेव**
केवळ 50 महिने



## विशेष ठेव



**7% व्याजदर**

या योजनेतील ठेव 7 दिवसानंतर केव्हाही काढता येते.
मुदतपूर्व पैसे काढताना झालेल्या दिवसांवर व्याज आकारणी करुन 7% प्रमाणे व्याज मिळवता येते.

मुदत
7 दिवस
ते
12 महिने

## लक्षाधिश ठेव योजना



दरमहा 1300 रुपये
भरा व 5 वर्षानंतर मिळवा
**1,00,000/-**

या योजनेअंतर्गत आपला दरमहा हप्ता पिग्मीद्वारे किंवा
आपल्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत भरण्याची सुविधा उपलब्ध

## मासिक पेन्शन योजना

एकरक्कमी 1 लाख रुपये
13 महिन्यांसाठी गुंतवा व
मिळवा प्रतिमहा 800/-

## स्पेशल सेव्हींग योजना

जमा रक्कमेवर मिळवा
दरमहा **4%** व्याज

आपल्या दुकाने व प्रतिष्ठाणांपर्यंत संस्थेमार्फत
कॅश ने-आण करणेसाठी संस्था प्रतिनिधीची
सुविधा उपलब्ध

जर सोनं आहे साथीला, तर काळजी कशाला...

# गोल्ड लोन

गोल्ड व्हॅल्युएशनच्या **100%** पर्यंत कर्ज उपलब्ध

- आकर्षक व्याजदर
- पारदर्शक प्रक्रिया शुल्क
- किमान कागदपत्रे
- सोपे परतफेड पर्याय
- सुरक्षित सोने



प्रिंट : साई ऑफसेट,संकेत / 9552155140